# ग्लोबल महातेज

१ रु. स्वागत मूल्य

अमळनेर | वर्ष १ ले | अंक : ५ | शुक्रवार, दि. २६ सप्टेंबर २०२५ | https://epaper.globalmahatej.com/ | पाने : ४ | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com


## दिनविशेष
२६ सप्टेंबर

- जागतिक गर्भनिरोधक दिन : हा दिवस कुटुंब नियोजनाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो.
- जागतिक कर्णबधिर दिवस : या दिवशी कर्णबधिर लोकांसमोरील आव्हानांकडे लक्ष वेधून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले जातात.




श्री मंगळग्रह मंदिरातील भूमीमातेला नवरात्रच्या पार्श्वभूमीवर देवीच्या विविध रुपांनी प्रतिदिन सजविले जाते. पहिल्या दिवशी देवीला शैलपुत्री, दुसऱ्या दिवशी ब्रह्मचारिणी, तिसऱ्या दिवशी चंद्र घंटा, तर चौथ्या दिवशी कृष्मांडा देवीच्या रुपात भूमीमातेला सजविण्यात आले होते. दरम्यान या विविध रुपांतील श्रीभूमीमातेच्या दर्शनासाठी स्थानिक भाविकांसह परगावचे शेकडो भाविक मंदिरात येत आहेत. (छायाचित्र : नितेश बारी)

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

*स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!*

*जय भारत...!*


*जय स्वदेशी...!!*

# भल्या पहाटे अमळनेरात दरोडा

## चौघानी चाकू लावून सोने व रोकड लुटली

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : घरमालक ड्युटीला निघताच चार जणांनी हातात चाकू घेऊन घरातून सुमारे चाळीस हजार रुपये आणि पाच ते सहा तोळे सोने लुटून नेल्याची घटना २५ रोजी पहाटे पाच वाजेच्या सुमारास घडली. दीपक पुंडलिक पाटील (रा. अयोध्यानगर, बंगाली फाईल) हे रेल्वेत तांत्रिक म्हणून नोकरीला आहेत. पहाटे पाच वाजता ते नोकरीला जायला निघाले आणि



काही वेळात त्यांच्या घरात चार अज्ञात चोरट्यांनी हातात चाकू घेऊन प्रवेश केला. घरातील व्यक्तींना चाकू दाखवून त्यांनी सामान अस्ताव्यस्त केले आणि कपाटातील सुमारे पाच ते सहा तोळे सोने तसेच अंदाजे चाळीस हजार रुपये रोख रक्कम लुटून नेली. घटनेनंतर डीवायएसपी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, पोलीस उपनिरीक्षक नामदेव बोरकर, हेडकॉन्स्टेबल मिलिंद सोनार, विनोद संदानशिव, उदय बोरसे, प्रशांत पाटील, गणेश पाटील, विनोद सोनवणे आणि सुनील पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली. ठसे तज्ज्ञांना बोलावण्यात आले असून पंचनामा प्रक्रिया सुरू आहे.

# पालिका पाजतेय गढूळ पाणी..!

## पैलाड, ओंकारनगर परिसरातील आजची सत्य स्थिती...!!

### नगर परिषदेचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये संताप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर :** शहरातील पैलाड, ओंकारनगर, शनी मंदिर परिसरात गाळ मिश्रित पाणीपुरवठा होत असल्याने या परिसरातील नागरिकांमध्ये आरोग्याच्या अनेक समस्या सुरू झाल्याची तक्रार परिसरातील नागरिकांनी केली आहे.

काहींना साथीच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. पालिका प्रशासन याकडे गंभीरतेने लक्ष न देता साफ दुर्लक्ष करीत आहे, असा आरोप नागरिकांकडून होत आहे. शहरात गाळमिश्रित पाणीपुरवठा होत असल्याने ' मोठ्या प्रमाणावर रोगराई पसरत असल्याचे यापूर्वीही समता कॉलनी, तांबेपुरा व ख्वाजानगर परिसरातील नागरिकांनी नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांना पत्र देऊन कळविले आहे. मात्र त्यावरही अद्याप कोणतीही समाधानकारक कार्यवाही झाल्याचे दिसत नसल्याने नागरिकांत संताप व्यक्त होत आहे. २५ सप्टेंबर रोजी रोजी पैलाड, ओंकारनगर, शनीपेठ भागात अत्यंत गढूळ पाणीपुरवठा झाला. याबाबत संबंधितांशी संपर्क साधला असता सध्या परतीचा पाऊस बरसत असल्याने असे होत आहे. पाणी गाळून प्यावे, तुरटी वापरावी, असा ' वैद्यकीय' सल्ला



देण्यात आला. जर आपल्याकडे अत्याधुनिक फिल्टर प्लांट आहे तर गाळमिश्रित पाणीपुरवठा का होतो? अधिकारी व कर्मचारी यांचे दुर्लक्ष होत आहे का? साथीच्या आजारामुळे रुग्णालये भरली आहेत. पालिकेने तत्काळ प्रभावी व कायम स्वरूपी उपाययोजना करावी अशी जोरदार मागणी होत आहे.



## तालुक्यातील रस्त्यांची पावसाने दुरावस्था

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर: तालुक्यातील बहुतांश गावातील रस्त्यांची पावसामुळे अत्यंत दुरवस्था झाली आहे. अनेक रस्त्यांवर चिखल अन् गारा झाला आहे. त्यामुळे वाहनेच काय पण पायी चालणे ही कठिण झाले आहे. ग्रामस्थांनी तक्रारी केल्यानंतर थातूर मातूर स्वरुपात काही ठिकाणी मुरूम टाकला जातो. तोही दर्जेदार असेलच याची खात्री नसते त्यामुळे काही दिवसातच मुरूम टाकलेले रस्तेही पुन्हा पुर्वीसारखे होतात.

रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी व रुग्णांचे खूप हाल होत आहेत. गावात डॉक्टर येण्यासही धजावत नाहीत. काहीं गावांमध्ये विविध निधीतून तयार झालेले रस्तेही निकृष्ट असल्याने खूपच कमी कालावधीत त्यांचे तीन-तेरा वाजतात. अनेक ग्रामस्थ तर म्हणतात की, आम्ही असे काय पाप केले आहे की आम्हांस इतका त्रास सहन करावा लागतो.

## उदयनगरसाठी संरक्षण कुंपणाकरीता आ.पाटील यांच्याकडे मागणी

### सरपंच प्रकाश वाघ व राजेश वाघ यांचे प्रयत्न

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील उदयनगर, जानवे वनक्षेत्रालगत असलेल्या गावांतील शेतांमध्ये वन्यप्राण्यांचा उपद्रव वाढला आहे. त्यामुळे शेतकरी त्रस्त आहेत. या शेतकऱ्यांच्या शेतीचे वन्यजीवांपासून संरक्षण होण्यासाठी तार कुंपण करून मिळावे, अशी मागणी उदयनगरचे सरपंच प्रकाश वाघ व सामाजिक कार्यकर्ते राजेश वाघ यांनी माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्याकडे केली आहे. निवेदनात म्हटले आहे, की तालुक्यातील उदयनगर, जानवे, कावपिंप्री, इंदापिप्री व पारोळा तालुक्यातील सुमठाणे, इंदवे, पिंपळकोठा आदी गावांच्या परिसरात वनक्षेत्र आहे. या क्षेत्र परिसरात निलगायी, हरीण, जंगली डुकरे, मोर आदी प्राणी वन्यक्षेत्रातून बाहेर येऊन मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांची पिके वाचविण्यासाठी दिवस-रात्र शेतात पहारा द्यावा लागतो. तरच थोडेफार पीक हाती येते. प्राण्यांच्या उपद्रवामुळे पिकांची पेरणी करूनही हातात काही येईल याची खात्री नसते. वनक्षेत्र परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी तर स्वतः जमीन कसणेच बंद केले आहे. आधीच हा भाग कायमस्वरूपी दुष्काळी, त्यात वन्यप्राण्यांच्या त्रासामुळे शेतकरी कर्जाच्या खाईत लोटला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झाली आहे. खरीप पिकांचे हे हाल आहेत, तर रब्बी हंगामाबाबत याहून कठीण परिस्थिती असते. या वनक्षेत्रात कायमस्वरूपी पाणवठ्यात पाण्याची व्यवस्था करून संपूर्ण जंगल परिसराला तारेचे कुंपण करावे.

वनक्षेत्र परिसरातील शेतकऱ्यांनाही शासनाने अनुदानातून तारेचे कुंपण द्यावे. जेणेकरून पिकांची होणारी नासधूस थांबेल. शेती उत्पन्नातून दोन पैसा शेतकऱ्यांच्या हातात येईल, अशी मागणी प्रकाश वाघ व राजेश वाघ यांनी केली आहे. त्यावर आमदार अनिल पाटील यांनी सर्वोतपरी सहकार्य करण्याचे अभिवचन दिले आहे.

## अमळनेरात आयशर गाडीने तिघांना उडवले....

**अमळनेर :** येथील हेडावे नाक्याजवळ आयशर चालकाने तिघांना उडवल्याची घटना गुरुवारी संध्याकाळी ७ वाजता घडली असून या अपघातात दोन जण जागीच ठार तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

यात तालुक्यातील एकरुखी येथील विश्वनाथ हिम्मत भिल्ल व ज्योत्याबाई विश्वनाथ भिल्ल हे जागीच ठार झाले असून बाळू साहेबराव पाटील हा जखमी झाला असून तिघांना ग्रामीण रुग्णालयात नेले आहे. याप्रसंगी परिसरातील नागरिकांनी जखमीं व मयतांना ग्रामीण रुग्णालयात ॲम्ब्युलन्स मधून पाठविण्यासाठी मदत केली. दरम्यान आयशर बाबत माहिती मिळाली नाही. पोलिसांत रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल नव्हता.


## ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

' चमकण्याची ' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

**जाहिरात बुकिंगसाठी संपर्क**

शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678

रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.


## ॥ नवदुर्गेचे आजचे रूप ॥

## स्कंदमाता


आश्विन शु. १ प्रतिपदा ते आश्विन शु. ९ हा काळ शक्ती पूजनाचा अर्थात शारदीय नवरात्र म्हणून लोकप्रिय सण आहे. या नऊ दिवसांत दुर्गेच्या ९ रूपांची पूजा केली जाते. यात दुर्गेची ९ नामाभिधान आहेत.

हे स्वरूप म्हणजे भगवान कार्तिक स्वामींची माता! बालस्वरूपामध्ये कार्तिक स्वामी मांडीवर बसले आहेत. ही माता चार हातांची असून, एका हातात कमळाचे फूल आहे. स्कंदमाता सुख-शांती प्रदान करते आणि प्रेम व वात्सल्याचे प्रतीक आहे.

फूल माळा : लालफुले, कुंकू

नैवेद्य : केळी

रंग : हिरवा








## लहानग्यांची मोठी भक्ती...!

नुकत्याच झालेल्या गणेशोत्सवानंतर निर्माणावस्थेत असलेल्या अनेक मूर्त्या मुर्तीकारांच्या स्थायी आणि अस्थायी कारखान्यांच्या बाहेर पडून आहेत. गणेशोत्सवानिमित्त सुरु झालेल्या मोठी धार्मिक वातावरण त्यापाठोपाठ येणाऱ्या हल्लीच्या नवरात्रोत्सवात शिगेला पोहचली आहे. त्याचा परिणाम सर्वच आबाल वृध्दांवर होत आहे. या छायाचित्रात असाच एक निरागस बालक हल्लीच्या भक्तीमय वातावरणाने प्रेरित होऊन रस्त्यावरील निर्माणाधिन श्री गणेशाच्या मूर्तीला चरण स्पर्श करतो आहे. ही मूर्ती शुर्चीभूतही नाही आणि तिची प्राणप्रतिष्ठाही झालेली नाही. त्यामुळे ही मूर्ती पुजेसाठी योग्य नाही, ही बाब या लहानग्याला निश्चितच माहिती नाही. मात्र त्याची निरागस भक्ती प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीच्या अंर्तमनाला शास्त्रीय कारणामूळे कदाचित पोहचणार नाही. मात्र थेट आकाशातील देवाला ही निरागस भक्ती निश्चितपणे या लहानग्याला आशीर्वाद देण्यास भाग पाडेल. हे मात्र



## याला म्हणतात उज्वल भारताचा हायटेकनेस...!

या छायाचित्रात एक मेंढपाळ पाठीवर सोलर पॅनल व हातात मोबाईलवर काहीतरी करतांना दिसत आहे.
खरे तर ही मेंढपाळ मंडळी आयुष्यभर भ्रमंती करत असते. कोणत्याही गाव वस्तीवर त्यांचा मुक्काम फार तर फार काही दिवस किंवा एकाद दोन महिन्यांचा असतो. त्यामुळे शाळेत जाणे, शिक्षण घेणे हे या मंडळींच्या नशिबीच नाही. हल्ली आपला देश सर्वच क्षेत्रात हायटेक होत आहे. या हायटेक होण्याचे वारे देशात सर्वदूर फिरू लागले आहे. त्याचाच परिपाक म्हणून थेट वाड्या-वस्त्यांवरील अशिक्षित लोकांनाही सोलर पॅनल आणि मोबाईलची माहिती व त्यांचा सदउपयोग करण्याची पद्धत कळू लागली आहे. रंजल्या गांजल्यांनाही त्यामुळे जीवन जगणे काहीसे सुखकर होत आहे. त्यांच्या गरिबीने पिचलेल्या अंधकारमय जीवनात थोडा का होईना. उजेड येऊ लागला आहे. त्यातूनच आपले भविष्य एकना एक दिवस प्रकाशमान होईल. या आशावादी स्वप्नात ही मंडळी जीवन कंठीत आहेत.



# स्वरदेवता लतादीदी

इंदूर नगरीत, २८ सप्टेंबर १९२९ च्या प्रभातकाळी एक स्वरकुंकुमाचा किरण पृथ्वीवर उतरला. तो स्वर म्हणजेच भारतरत्न लता मंगेशकर, स्वरांच्या विश्वातील हा तेजोमय दीप आजही अखंड तेज पसरवत आहे. दीदींचा आवाज हा केवळ संगीत नव्हे, तर एक साधना, एक आराधना आहे. त्यांचा प्रत्येक सुर जणू प्रार्थनेतील घंटानाद, तर प्रत्येक आलाप जणू भक्तीतील आरतीचा ध्वनी. भक्तांची रांग कितीही मोठी असली तरी त्यांच्या स्वरांचा महाप्रसाद सर्वांना तृप्त करतो, संपत नाही. पं. दिनानाथ मंगेशकर हे स्वरसम्राट, मूळचे हर्डीकर म्हणून ओळखले जात. नंतर त्यांचे नाव झाले अभिषेकी. परंतु मंगेशीच्या देवीवरील अनंत भक्तीमुळे त्यांनी स्वतःहून आपले आडनाव बदलून कायमचे केले ते म्हणजे मंगेशकर होय. याच आडनावाने पुढे जगभर त्यांच्या स्वरांचा झंकार घडवला. आज नवरात्राच्या मंगल प्रसंगी, दीदींचा स्वर जणू देवीचा नादब्रह्म भासतो. गीत, भजन, भक्तिगीते – प्रत्येक सुरातून आपणास दर्शन होते त्या स्वरमातेचे. त्यांचा आवाज म्हणजे भक्तांच्या अंतःकरणातील आरती; त्यांचे गाणे म्हणजे अखंड देवीस्मरण. अनेकांना ठाऊक नसलेली एक स्वर्णीम माहिती म्हणजे दीदींचे मूळ नाव होते हेमा मंगेशकर, किती अद्भुत योगायोग आहे हा...! त्याचे कारण म्हणजे 'हेमा' चा अर्थ सोनं होतो अर्थात लता दिदींचा स्वर म्हणजे जणू बावनखणी (२४ कॅरेट) सोनं...! दीदींना शब्दबद्ध करणे केवळ अशक्य आहे. त्याचे कारण म्हणजे जिथे शब्द सामर्थ्य संपते तेथून दीदींचा आवाका सुरू होतो.

**शरद सौनवणे : ९४२०१०८३०५**

**लता दीदींचे मूळ नाव हेमा मंगेशकर असे होते हे किती जणांना माहिती आहे?**
**याबाबतची सविस्तर माहिती पुढील अंकात...!**

## श्रीमंतांचा गरीब भारत देश...!




ॲपलला मोबाईल विश्वातील सर्वात स्टेटस फूल आय फोन मानले जाते. ॲपलचे सर्वच मॉडेल्स् प्रचंड महागडे अर्थात सर्वसामान्यांच्या आवाक्या पलीकडील असतात. ॲपल ही कंपनी दरवर्षी नवे मॉडेल लॉन्च करते. मोबाईल शौकिनांना या मॉडेलची जीवतोड प्रतिक्षा असते. यावर्षी ॲपलने १७ या मॉडेलचा मोबाईल नुकताच लॉन्च केला. तो खरेदी करण्यासाठी ठिकठिकाणच्या शोरूमसमोर विशेषतः तरूणाईने कित्येक तास रांगेत उभे राहून प्रतिक्षा केली. काही ठिकाणीतर मोठे राडेही झाले. भारतात एकीकडे उपासमारीने लाखो लोक त्रस्त आहेत. अन्नासाठी भुकेलेली जनता अनेक ठिकाणी दोन घासांसाठी रांगा लावतात. तर दुसरीकडे लाखो रुपयांचा मोबाईल घेण्यासाठी अक्षरशः झुंबड केल्याचे दिसून आले. भारतातील गरिबी आणि श्रीमंतीच्या या अजब-गजब दरीमुळेच भारताला गरिब लोकांचा श्रीमंत देश म्हणतात...!

## हे फक्त वाचू नका... त्यातून बोध घ्या.

भारतात इंग्रज आले, फक्त १७९ नंतर ते १हजार झाले, नंतर १० हजार आणि, नंतर १ लाख झाले आणि या एक लाख इंग्रजांनी आपल्या तेव्हाच्या ३० करोड भारतीय जनतेवर मनमानी राज्य केले. हे कसे बरे शक्य झाले असेल ? त्याचे कारण म्हणजे जे १७९ इंग्रज पहिल्यांदा भारतात आले होते. त्यांनी भारतीय लोकांचा सखोल अभ्यास केला होता. त्यातून त्यांनी एक निष्कर्ष काढला जो आजही म्हणजेच सन २०२५ मध्येही तंतोतंत लागू होतो. तो म्हणजे भारतीय लोकांना, जातीभेद, धर्मभेद, गरीब-श्रीमंत, प्रांत भेद या गोष्टींमध्ये पेटवायचे मग हे भारतीय ३० काय ३०० करोड जरी झाले तरी, कधीही आपल्या विरोधात लढू शकणार नाहीत. त्याचे कारण म्हणजे, ते एकमेकांनाच कापत बसतील. भारतीय कधीही एक होऊ शकत नाहीत. इतका द्वेष त्यांना परस्परांबद्दल आहे.

मीआदिवासी, मी मराठा, मी सोनार, मी धनगर, मी चांभार, मी कुंभार, मी मांग, मी महार, मी ब्राम्हण, मी माळी. मी तेली, मी आमुक आणि मी तमुक झालं यातच, भारतीय आपले श्रेष्ठत्व मानतात आणि त्यातच गुंग राहतात. (विश्वसनीय सुत्रांच्या मते भारतात ६७४२ जाती आहेत.) आज समस्त भारतीयांनी थोर युग पुरुषांच्याही जाती-जातीत वाटण्या केल्या आहेत. आम्ही राघोजी भांगरे आदिवासींचे झाले. स्वातंत्र्यवीर सावरकर ब्राह्मणांचे झाले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्धांचे झाले. छत्रपती शिवाजी महाराज मराठ्यांचे झाले. मल्हारराव होळकर धनगरांचे झाले. महात्मा ज्योतीराव फुले माळी समाजाचे झाले. अण्णाभाऊ साठे मातंगांचे झाले. यातून हेच लक्षात येते की, ' जाता जात नाही तीलाच जात म्हणतात. जाती-जातीमुळेच इंग्रजांनी आपली पार वाताहत केली. भारतीयांना जाती भेदाच्या चक्रव्युहात गुंतवून ठेवून इंग्रजांनी बिनदिक्कतपणे भारतीयांना अक्षरशः गुलाम बनवून बेदरकारपणे दिडशे वर्ष राज्य केले. भारतीयांचे प्रचंड हाल व हत्या करून अगणित लूटही केली. इंग्रजांना घालवून आपण स्वतंत्र्य व प्रजासत्ताक झालो आहोत. मात्र आजही बहूतांश भारतीयांच्या मानगुटीवर जात-धर्म आणि त्यातील उच्च-निच्चतेचे भूत विराजमान आहेत. आपण त्या भूताचे अक्षरशः गुलाम झालो आहोत.

**जाती-धर्मातील भेदभावाचे असे उदाहरण जगात कुठेही नाही.**

आपल्या भारत देशात : कुत्रा, माकड, गाय, बैल, साप, मुंगी, मासा, डुक्कर, वाघ, सिंह, गरुड, बोकड तथा मेष, मांजर, उंदीर, ससा, कबूतर, चिमणी, घोडा, कावळा, मोर, आकाश, पाताळ, डोंगर, पृथ्वी, वडाचे झाड, तुळशीचे रोप, दुर्वा, नदी, समुद्र, सूर्य,चंद्र सर्व ग्रह-तारे, अग्नि, वायु, जल, इतकेच नव्हे तर "दगड" हे सारे आपल्या भारतीयांच्या संस्कृतीत देव व देवी आहेत. मात्र जित्या-जागत्या माणसांना त्यांच्या जाती-पाती प्रमाणे उच-निचतेच्या बंधनात जखडलल

**संताना केले जाती-पातीत बंदिस्त...!**

संत रोहीदास - चांभार, संत गोरा - कुंभार, संत सावता-माळी वाल्मीक ऋषि- कोळी. संत नरहरी - सोनार, संत चोखोबा - महार, संत नामदेव - शिंपी, संताजी महाराज - तेली, संत सेना महाराज-न्हावी, संत ज्ञानेश्वर -ब्राह्मण, संत तुकाराम - वाणी, संत जनाबाई - विणकर. (काही संतांची नावे सुटली असल्यास किंवा जातनिहाय माहिती चुकली असल्यास क्षमस्व) खरेतर यासर्व संतानी जातीभेद नष्ट व्हावा यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. मात्र त्यांच्याच अनुयायांनी तथा सर्वच प्रकारच्या समाजबांधवांनी या संताना जाती-पातीत बंदिस्त करून ठेवले आहे. इंग्रजांच्या गुलामगिरीतून सुटका करून घेण्यासाठी आपण अगणित रक्त वाहिले आहे. आता जातीच्या गुलामगिरीत राहण्यासाठी सर्रास रक्तपात सुरु आहे. हे सारे काही लवकर थांबले नाही तर पुन्हा काहीतरी अघटित घडल्याशिवाय राहणार नाही.

# जेवणावळीला केळीचे पान, शास्त्रीयदृष्ट्या तेच खूप छान !

**अमळनेर :** हिंदू संस्कृतीत केळीच्या पानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. केळीच्या पानावर केलेले भोजन शास्त्रीयदृष्ट्या योग्य असल्याचे मत अनेक जाणकारानी व्यक्त केले आहे.

केळीच्या पानातील चिकट द्रव खाल्ला तर कॅन्सर वाढीला बळ देणारी ग्रंथी हळूहळू निष्क्रिय होत जाते, हे हैदराबाद मधील एका शास्त्रज्ञाने सिद्ध केले आहे. आपल्या पूर्वजांना ही बाब ज्ञात असावी म्हणूनच ते केळीच्या पानावर जेवण करायचे. गरम पदार्थ त्यावर टाकले, तर तो चिकट द्रव त्या अन्नाद्वारे पोटात जातो.

सध्या तर प्लास्टिक व प्लास्टिक कोटिंगच्या पत्रावळी, द्रोण आदी सर्रासपणे वापरल्या जात आहेत. त्यावर गरम पदार्थ टाकल्यास ते पोटात अन्नाद्वारे जाऊन कॅन्सरचा धोका बळावतो आहे. परिणामी जुने ते सोने, म्हणण्याची वेळ आली आहे.

केळीच्या पानावर जेवण केल्यास अंगावर डाग, खाज, पुरळ, फोड येणे अशा प्रकारच्या समस्या दूर होतात. केळीच्या पानामध्ये अधिक प्रमाणात 'ॲपिगालोकेटचीन गलेट आणि ईजीसीजी सारखे पॉलीफिनोल्स ॲन्टीऑक्सीडेंट आढळतात. केळीच्या पानावर जेवण केल्यास हे ॲन्टिऑक्सिडेंट आपल्या शरीराला मिळतात. हे ॲन्टिऑक्सिडेंट त्वचेला दीर्घकाळ तजेलदार ठेवतात. अंगावर पुरळ, डाग, मुरूम असल्यास केळीच्या पानावर खोबरेल तेल टाकून ते पान अंगाला गुंडाळल्यास त्वचेचे विकार लवकर बरे होतात.

### पितृपक्ष, सणवार व व्रत वैकल्यात महत्त्व

**केळीच्या पानांचा मोठा आकार, लवचिकता, तंतुमयपणा आणि सहज उपलब्धता या वैशिष्ट्यांमुळे जेवायला केळीचे पान घेण्याची परंपरा भारतात, त्यातही विशेषत्वाने दक्षिण भारतात अधिक प्रमाणात आढळते. काही अन्नपदार्थ शिजवतांना भांड्यांच्या तळाशी केळीचे पान ठेवण्याची पद्धतही आहे. त्यामुळे अन्नपदार्थाला मंद सुवास येतो. शिवाय पदार्थ खाली लागून करपण्याचा धोकाही टळतो. अळूवडी सारखे पदार्थ केळीच्या पानात गुंडाळून शिजवतात. त्यामुळे भारतात पितृपक्ष, सणवार व व्रतवैकल्य आदी प्रसंगी केळीच्या पानावर जेवणाची पद्धत आहे.**



## कितनी होती है नेशनल फिल्म अवॉर्ड की प्राइज मनी?

शाहरुख खान, विक्रांत मैसी, रानी मुखर्जी, मोहनलाल, सान्या मल्होत्रा सहित कई सितारों को राष्ट्रीय पुरस्कार से सम्मानित किया गया. क्या आप जानते हैं कि यहां सम्मानित होने वाले स्टार्स को कितनी प्राइज मनी मिलती है? राष्ट्रपति से ऑफिशियल सर्टिफिकेट के अलावा पुरस्कारों में शॉल या पट्टिका भी शामिल होती है, जिसका सांस्कृतिक महत्व होता है. गोल्डन लोटस के साथ करीब ३ लाख की प्राइज मनी और सिल्वर लोटस के साथ २ लाख की नकद पुरस्कार राशि दी जाती है.



# जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश : अवनीश शरण

अनेकदा अपयश आले तरी खचून न जाता, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश मिळवता येते, हे छत्तीसगडमधील आयएएस अधिकारी अवनीश शरण यांनी सिद्ध केले आहे. शालेय जीवनात जेम-तेम गुण मिळवणारे अवनीश शरण राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत तब्बल १० वेळा अपयशी ठरले. मात्र, त्यांनी हार न मानता यूपीएससी परीक्षेत यश मिळवले आणि आयएएस बनून दाखवले. त्यांच्या संघर्षाची कहाणी स्पर्धापरिक्षेत यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

अवनीश शरण यांचे सुरुवातीचे जीवन अतिशय सामान्य होते. त्यांनी सरकारी शाळेतून शिक्षण घेतले. ते अभ्यासात फार हुशार नव्हते. १०वी मध्ये त्यांना केवळ ४४.७% आणि १२वी मध्ये ६५% गुण मिळाले होते. त्यांनी केवळ ६०% गुणांसह पदवी प्राप्त केली. अवनीश शरण यांच्या यशाची कहाणी ऐकून तुम्हीही म्हणू शकता की, केवळ गुण तुमच्या भविष्याची दिशा ठरवू शकत नाहीत, तर कठोर परिश्रम, ध्येयावरील निष्ठा आणि ते साध्य करण्याची तीव्र इच्छा असणे आवश्यक आहे.

अवनीश शरण राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतही उत्तीर्ण होऊ शकले नव्हते. जवळपास १० वेळा त्यांना अपयश आले. तरीही, त्यांनी हार मानली नाही. अवनीश शरण सांगतात की, अपयशाचा सामना करावा लागला तरी थांबू नये. आपल्यात अधिक सुधारणा करत सतत प्रयत्नशील राहावे. पहिल्यापेक्षा अधिक चांगले करण्याचा प्रयत्न तुम्हाला नक्कीच यश मिळवून देऊ शकतो. त्यांनी ' सीडीएस ' आणि ' सीपीएफ ' च्या परिक्षेत ही ते नापास झाले होते.

राज्य ' पीसीएसची ' पूर्व परीक्षा त्यांनी अनेकदा दिली. प्रत्येक वेळी ते नापास झाले. मात्र त्यांनी हार मानली नाही. सिव्हिल सर्व्हिसेसच्या पहिल्या प्रयत्नात ते मुलाखतीपर्यंत पोहोचले, पण त्यांची निवड झाली नाही. यूपीएससीच्या पहिल्या प्रयत्नात अपयश मिळाल्यानंतरही ते निराश झाले नाहीत. त्यांनी पुन्हा प्रयत्न केले आणि अखेर सन २००९ मध्ये यूपीएससीचा लागलेल्या निकालात त्यांनी ७७ वा क्रमांक मिळवला. अशा तऱ्हेने त्यांनी आपले आयएएस होण्याचे स्वप्न पूर्ण केले.

सध्या ते छत्तीसगडमधील बिलासपूर जिल्ह्यात कार्यरत आहेत.

SUCCESS स्टोरी



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. १७, रामचंद्रनगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) ४२५००२ येथे छापून गट नं. १६०, प्लॉट नं. ५१/५२, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) ४२५४०१ येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. /२५/ ), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : ७०११००४०४०, ७०११००४२४२, ई-मेल : globalmahatej@gmail.com






अमळनेर : येथील मराठा मंगल कार्यालयात बुधवारी मराठी वाङ्‌मय मंडळ, आप्पासाहेब प्रा. र. का. केले सार्वजनिक ग्रंथालय व मोफत वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शारदीय व्याख्यानमालेंतर्गत ज्येष्ठ समाजसेविका तथा सुप्रसिद्ध गझलाकार श्रीमती ममताताई सिंधुताई सपकाळ यांचा यथोचित सन्मान करताना माजी नगराध्यक्षा तथा जिल्हा परिषद सदस्या सौ. जयश्रीताई पाटील व मराठी वाङ्‌मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी. शेजारी उपस्थित रसिक श्रोते. (छायाचित्रे : भरत पाटील)

# जगण्याची उमेद कायम ठेवून स्वत:सह समाज घडवा

## श्रीमती ममताताई सिंधुताई सपकाळ यांचे शारदीय व्याख्यानमालेत आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर :** मुळातच प्रत्येक माणूस आयुष्याचा प्रवास करताना अनेक आव्हानांवर मात करीत जगतो. प्रत्येकाचे जगणे त्या-त्या स्थितीवर अवलंबून असते. मात्र माझ्या आईने नेहमी मला समाजातील स्थिती जाणून घेत स्वतःला सावरत समाज कसा घडविता येऊ शकतो, हे शिकविले. त्यामुळेच मीही घडत गेली. तुम्हीही आयुष्य जगताना स्वतःला सावरत जगण्याची उमेद कायम ठेवत स्वतःसह समाजासाठी काय करता येईल, याचा शोध घेऊन समाजालाही घडवा, असे आवाहन ज्येष्ठ समाजसेविका तथा सुप्रसिद्ध गझलाकार श्रीमती ममताताई सिंधुताई सपकाळ यांनी केले. येथील मराठा मंगल कार्यालयात मराठी वाङ्‌मय मंडळ, आप्पासाहेब प्रा. र. का. केले सार्वजनिक ग्रंथालय व मोफत वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शारदीय व्याख्यानमालेत 'हा खरा जीवन प्रवास' या विषयावरील तृतीय पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या. व्यासपीठावर मराठी वाङ्‌मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, उपाध्यक्ष श्यामकांत भदाणे, कार्याध्यक्ष प्रा. श्याम पवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती बाळासाहेब जीवन पाटील, माजी नगराध्यक्ष सुभाष भांडारकर, सात्रीचे सरपंच महेंद्र बोरसे, लकी डिजिटलचे संचालक मंगेश महिंद, प्रदीप साळी होते. सुरूवातीला सामुदायिकरित्या सरस्वती वंदना म्हटली गेली. त्यानंतर श्रीमती ममताताई सपकाळ यांचा डॉ. अविनाश जोशी व माजी नगराध्यक्षा तथा जिल्हा परिषद सदस्या सौ. जयश्रीताई पाटील यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच सुभाष भांडारकर, बाळासाहेब पाटील, मंगेश महिंद, प्रदीप साळी व महेंद्र बोरसे यांच्यासह काही देणगीदारांचाही मराठी वाङ्मय मंडळाच्या पदाधिकाऱ्यांकडून याप्रसंगी पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. श्रीमती सपकाळ म्हणाल्या, की नेहमीप्रमाणे कुठेही जायचे असेल, तर त्या ठिकाणाची वेगवेगळ्या अंगांनी आपल्याला माहिती असावी, या उद्देशातून ' गुगल ' वर सर्च करून अमळनेरची माहिती मिळविली. प्राथमिक शिक्षण जरी जळगाव जिल्ह्यातील फैजपूरला घेतले असले, तरी अमळनेर व धुळे ही ठिकाणे जळगाव जिल्ह्यातच अर्थात खानदेशात समाविष्ट आहेत, हे मला यावेळी कळाले. कारण या भागात मी कधी आजवर आलेच नाही. अमळनेर या शहराला माझ्यादृष्टीने मोठा अर्थ आहे. तो असा, की जिथे 'मळ' नाही असे हे 'अमळनेर' आहे. अमळनेर ही समाजातील मुलांमध्ये शिक्षकाच्या भूमिकेतून मायेचा ओलावा निर्माण करणाऱ्या साने गुरुजींची व व्यावसायिकदृष्ट्या स्वतःला घडवत सामाजिक देणे देणाऱ्या अजीम प्रेमजींची कर्मभूमी आहे. याचा तुमच्याप्रमाणेच मलाही अभिमान वाटतो. आईने मला नेहमी जगताना अडचणी आल्या, संकटे आली तरी रडत बसण्यापेक्षा त्याचे समाधान शोधत त्यावर मात कशी करता येईल, हे शिकविले. संघर्षाचे जीवन जगणारी आई नेहमीच सकारात्मक असायची. मी बालपणापासूनच शिक्षणाच्या निमित्ताने आईजवळ नव्हती. मात्र आईने नेहमी मायेचा ओलावा कायम ठेवत स्वतःला घडवितानाच समाजाभिमुख जाणीव ठेवत सामाजिक देणे देण्याची शिकवण दिली. आईने ४ जानेवारी २०२२ रोजी जगाचा निरोप घेतला तेव्हा मला वाटत होते, की आईचे कार्य पुढे कसे नेता येईल? परंतु आईच्या शिकवणुकीप्रमाणे त्यावर मी नेहमी तिला स्मरत निर्णय घेत समाजकार्य करण्यासाठी प्रयत्नशील आहे. आजमितीस आमच्या संस्थेत सव्वातीनशेवर अनाथ मुले आहेत. त्यांना सक्षम कसे बनविता येईल, हा आईप्रमाणेच माझाही ध्यास आहे. समाजात वावरताना प्रत्येकाला समजून घेण्याचा वसाही मला आईकडूनच मिळालेला आहे. व्याख्यान देणे मला खऱ्या अर्थाने जमत नाही. मात्र, त्याची सोडवणूक मी माझ्या गझलांच्या रूपाने करीत असते. आईच्या तोंडून ऐकलेल्या गझलांतून मला हा वारसा प्राप्त झाला असला, तरी आदरणीय सुरेश भटांच्या भेटीतूनच ही प्रेरणा मला वास्तवतेत मिळाली आहे.

सन २०१० च्या आधी मी काहीही लिखाण केले नाही. जे काही लिखाण केले ते गेल्या १५ वर्षांतील प्रवासातले आहे. यावेळी श्रीमती सपकाळे यांनी ' अजून आहे प्रेम तुझ्यावर ', ' जन्म मला तू द्यावा आंदण...पुढल्या जन्मी ', 'मी गुलाबासारखी नव्हती कधी', ' तू सुखाचा चेहरा नव्हतीस आई ', ' काय सरले म्हणू... काय उरले म्हणू... ', ' पूल आहे जोडणारा की दरी आहे', 'चूकही वाटते का बरोबर मला', ' नको ही सावली कारण मला ऊन आवडते ' या गझला सादर करून त्यांच्यातील भावरम्य प्रतिभेचे दर्शन घडविले. 'आयुष्याच्या या वळणावर हात रिकामे ' या गझलेने व्याख्यानाचा समारोप करताना हाच खरा तुमचा-माझा खरा जीवन प्रवास असल्याचे पटवून दिले. प्रा. शीला पाटील व बन्सीलाल भागवत यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

### वडिलांच्या प्रेमाबाबत काहीशी खंत

श्रीमती ममताताई सपकाळ म्हणाल्या, की मला वडीलांचे प्रेम कमी लाभल्याची मला नेहमीच खंत राहीली. त्याबाबत मी एकदा आईला विचारले असता ती म्हणाली, की ममता तुला मी रक्तावर नव्हे, तर दुधावर सोडले आहे. त्यामुळे तुझ्या वडिलांसह माझाही तुझ्यावर अतोनात विश्वास अन् प्रेम आहे. आपल्या सान्निध्यात येणाऱ्या अनाथांसह समाजातील खितपत पडलेल्या घटकांवर सतत प्रेम कर. कुणावरही अन्याय होऊ देऊ नकोस. याचाच अर्थ आईने मला कासविणीप्रमाणे जपले अन् मोठे केले आहे. मीही आईवडिलांच्या विश्वासाला कायम जपले आहे.




# अमळनेर येथील धनगर समाजा तर्फे एस .टी .आरक्षण अंमलबजावणीसाठी तहसीलदार यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर -सकल धनगर समाज व राजे मल्हारराव होळकर प्रतिष्ठाना तर्फे एस.टी.आरक्षण अंमलबजावणीसाठी जालना येथील उपोषण कर्ते दीपक बोराडे यांच्या समर्थनार्थ व पाठिंबा देण्यासाठी तहसीलदार रुपेश कुमार सुराणा यांना धनगर समाज बांधवांतर्फे निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या शेकडो बैठका झाल्या आहेत. अनेक आंदोलने झाली आहेत. तसेच बारामती येथे धनगर समाजाच्या लाखोंच्या जनसमुदायाला संबोधित करताना मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी एस. टी. आरक्षणाबाबत दिलेला शब्द पाळला नाही. त्यामुळे आमचे बांधव दीपक बोराडे यांनी १७ सप्टेंबरपासून जालना येथील नियोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक येथे उपोषणास बसले आहेत. त्यांच्या उपोषणाचा सहावा दिवस आहे. तरी या उपोषण आंदोलनाची कोणीही दखल घेतली नाही. तरी आपण दोन दिवसाच्या आत धनगर जमातीच्या घटनादत्त एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करून दीपक बोराडे यांचे उपोषण तात्काळ सोडवावे. अन्यथा दीपक बोराडे सांगतील त्या पद्धतीने धनगरी बाणाने राज्यभरात तीव्र आंदोलन छेडले जाईल. तरी उपोषणकर्त्यांच्या मागण्यांना शासनाने तातडीने प्रतिसाद द्यावा. निवेदनावर बन्सीलाल भागवत, एस.सी.तेले सर, प्रदीप कंखरे, रमेशदेव शिरसाठ, आनंदा हडपे सर, ए.बी. धनगर सर, दिलीप खांडेकर, तुषार इदे, संजय धनगर (मांडळ), रमेश धनगर, दशरथ युवराज लांडगे, विजय हिवराळे, सचिन शिरसाठ, दत्तात्रय धनगर, नामदेव ठाकरे, तुकाराम ठाकरे,परशुराम ठाकरे (धानोरा) आदींच्या सह्या आहेत .

# पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांविरोधात अमळनेरला व्हॉईस ऑफ मीडियाने दिले निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : त्र्यंबकेश्वर जि. नाशिक येथे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या योगेश खरे, अभिजीत सोनवणे आणि किरण ताजणे या पत्रकारांवर गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी केलेल्या भीषण हल्ल्याचा अमळनेर येथील आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटना व्हॉईस ऑफ मिडिया तर्फे तीव्र निषेध करण्यात आला. याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे.

पत्रकारांवरील वारंवार होणाऱ्या हल्या विषयी संघटनेतर्फे संताप व्यक्त करत दोषींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी व्हाईस ऑफ मिडिया चे प्रदेश सरचिटणीस डॉ. डिगंबर महाले, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष मिलिंद टोके आणि जळगांव जिल्हाध्यक्ष कल्पेश महाले यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न प्रभावीपणे मांडण्यात आला.

निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार समाजाचा कणा आहे. सत्य आणि न्यायासाठी अहोरात्र काम करणाऱ्या पत्रकारांवर होत असलेले हल्ले ही लोकशाहीला काळीमा फासणारी बाब आहे. पत्रकार संरक्षण कायदा अस्तित्वात असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. तातडीनेकडक कारवाई झाली पाहिजे, अन्यथा पत्रकारांच्या सुरक्षितेसाठी मोठा संघर्ष उभारण्यात येईल.

पत्रकारांवरील हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत. अश्या प्रकारची राज्यातील पत्रकारांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना राबविण्यात याव्यात, असे भविष्यात असे प्रकार होऊ नयेत यासाठी शासनाने ठोस व कडक धोरण आखावे आदी मागण्यांचा समावेश आहे.

निवेदन देतांना **व्हाईस ऑफ मीडियाचे अमळनेर तालुका** अध्यक्ष उमेश काटे, जिल्हा उपाध्यक्ष उमेश धनराळे, जिल्हाध्यक्ष साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्ष संजय सूर्यवंशी, जिल्हा संघटक जयेश काटे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बापूराव ठाकरे, तालुकाध्यक्ष साप्ताहिक विंग चे तालुकाध्यक्ष अजय भामरे, शहराध्यक्ष जयवंत वानखेडे आणि तालुका उपाध्यक्ष गौतम बिराडे, सचिव जितेंद्र पाटील, कोषाध्यक्ष रवींद्र मोरे, विवेक अहिरराव, धनंजय सोनार मिलिंद पाटील, सहसचिव ईश्वर महाजन, तालुका प्रसिद्ध प्रमुख दिनेश पालवे, विनोद कदम, राहुल बहिरम, रजनीकांत पाटील, रवींद्र बोरसे, उमाकांत ठाकूर, कमलेश वानखेडे, मधुसूदन विसावे, सुखदेव ठाकूर, भाऊसाहेब देशमुख, शरद कुलकर्णी, किरण चव्हाण निरंजन पेंढारे, दयाराम पाटील, भरत पाटील, प्रकाश जैन, बी.एल. पाटील, रमण भदाणे, विशाल मैराळे, प्रसाद जोशी, सोपान भवरे, दिनेश नाईक, संजय पाटील, जगदीश पाटील, चंद्रकांत निकम, भूषण महाले, शामकांत पाटील, अमित ललवाणी उपस्थित होते.



# अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समितीतील नियमबाह्य पदभरतीविरोधात एकदिवसीय धरणे आंदोलन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : राज्य शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने १९ मे २०२५ रोजी सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांतील पदभरतीस स्थगितीचे आदेश जारी केले. त्यानुसार जिल्हा उपनिबंधकांनीही अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समितीला १ ऑगस्ट २०२५ रोजी पदभरतीस स्थगिती दिली होती. तथापि, या आदेशाकडे दुर्लक्ष करून समितीचे सचिव व सभापती यांनी संगनमत करून १० ऑगस्ट २०२५ रोजी नियमबाह्य पदभरतीची जाहिरात प्रसिद्ध केली.

या जाहिरातीच्या माध्यमातून त्रयस्थ एजन्सीद्वारे अर्जदारांकडून परीक्षा शुल्कच्या नावाखाली लाखो रुपयांची वसुली केल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून आर्थिक स्वार्थ साधण्यासाठी बेरोजगारांची झालेली लूट थांबविण्यासाठी आणि जमा झालेली शुल्क अर्जदारांना परत मिळावे. तसेच समितीचे सचिव व सभापती यांच्यावर कठोर कारवाई व्हावी, या मागणीसाठी अमळनेर उपविभागीय कार्यालयासमोर छत्रपती शिवराय द्वितीय राज्याभिषेक दिनी ( २४ सप्टेंबर २०२५ ) एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी यापूर्वी जिल्हा उपनिबंधकांची भेट घेऊन पदभरती प्रक्रियेतील नियमबाह्य व बेकायदेशीर बाबी निदर्शनास आणून दिल्या होत्या.

उपनिबंधकांनीही पदभरती बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट मत व्यक्त केले असले, तरी शासन स्तरावर अद्याप कोणतीही कारवाई न झाल्याने हा लढा उभारावा लागल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

हे धरणे आंदोलन निंबा धुडकू पाटील (रा. वाघोदे) व हर्षल अशोक जाधव (रा. सोनखेडी) यांच्या नेतृत्वाखाली झाले. शासनाने भरतीबाबत तत्काळ दखल घेऊन बेरोजगारांची झालेली आर्थिक फसवणूक रोखावी आणि दोषींवर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

# ज्येष्ठांच्या सामाजिक, मानसिक आरोग्यासाठी चर्चासत्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि येथील धनदाई कला व विज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक सामाजिक व मानसिक आरोग्य या विषयावर दि. २३ सप्टेंबर रोजी संस्थेचे चेअरमन डी. डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्राचे उदघाटन झाले. प्राचार्य डॉ. एम. एच. पाटील यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयीन जीवनातील आठवणी जागवत प्रा. शिवाजीराव पाटील यांच्या शिकविण्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अध्यक्ष डी. डी. पाटील यांनी सर्वांनी आरोग्याची काळजी घेत आनंदी जीवन जगावे, असे आवाहन केले. व्यासपीठावर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रा. शिवाजीराव पाटील, सचिव एस. एम. पाटील, माजी प्राचार्य डॉ. बी. एस. पाटील, जिजाऊ ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्षा श्रीमती रजनीताई पाटील आदी उपस्थित होते. पहिल्या सत्रात प्रा. शिवाजीराव पाटील यांनी ज्येष्ठांचे महत्त्व, त्यांच्या समस्या आणि शेतीशी संबंधित माहिती सर्वांनी दिली जावी, असे सांगितले. नंदुरबारचे माजी प्राचार्य डॉ. बी. एस. पाटील यांनी तरुण वयात केलेल्या चुकांचे परिणाम नंतरच्या आयुष्यात भोगावे लागतात, असे सांगितले. तिसऱ्या सत्रात गोकुळ पाटील यांनी 'मानसिक स्वास्थ्य कसे टिकून ठेवावे' यावर मार्गदर्शन केले.

चौथ्या सत्रात 'साठोत्तर आनंदी जीवन' या विषयावर श्रीमती रजनीताई पाटील यांनी महिलांना कामातून कधी सुटी नसते, असे सांगत कविता सादर करून छोट्या गोष्टींमधून आनंद मिळविण्याचा सल्ला दिला. समारोपीय समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष के. डी. पाटील होते. त्यांनी नवीन पिढीवर चांगले संस्कार करण्यासाठी ज्येष्ठांचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक डॉ. भगवानराव भालेराव होते. प्रा. राहुल इंगळे, प्रा. प्रशांत पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास प्रा. किशोर पाटील, डॉ. लीलाधर पाटील, डॉ. संगीता चंद्राकर, प्रा. मीनाक्षी इंगोले, डॉ. महादेव तोंडे, प्रा. प्रवीण पवार, प्रा. रमेश पावरा, प्रा. जयवंत पाटील, रवींद्र चौधरी, कैलास अहिरे, एस. बी. गिरासे, दगडू पाटील आणि राजेंद्र पाटील यांनी सहकार्य केले.




# कुंकुमार्चन शास्त्र फलश्रुती काय ?

### कुंकुमार्चन करणे म्हणजे काय ?

इच्छित देवी-देवतांचा नामजप करत एक-एक चिमूटभर कुंकू मूर्ती अथवा तस्वीरीमधील चरणां पासून प्रारंभ करून तिच्या डोक्या पर्यंत वहावे. इच्छित देवी देवतांचा नामजप करत कुंकवाने स्नान घालणे यालाच कुंकुमार्चन म्हणतात.

### कुंकुमार्चन संबंधी कोणती काळजी घ्यावी ?

कुंकुमार्चन करताना देवीची प्रतिमा अथवा श्री यंत्र अथवा प्रतिकात्मक वस्तु (सुपारी, यंत्र, ताम्रपट, सुवर्णपट ) पात्रात घेऊन शुचिर्भुत (शुद्ध) करुन घ्यावे. त्यानंतर करंगळी व चाफेकळी बोटाचा स्पर्श न करता केवल अंगठा तर्जनी व मधील बोट यानीच कुंकुम घेऊन देवीच्या चरणा पासून मस्तका पर्यंत वाहावे. यालाच कुंकवाने स्नान घालणे असे म्हणतात.

### कुंकुमार्चनाचे शास्त्र

अशी मान्यता आहे की, कुंकवात शक्तीतत्त्व आकृष्ट करण्याची क्षमता जास्त असते म्हणून देवीच्या मूर्तीला कुंकुमार्चन केल्यावर ती जागृत होते. जागृत मूर्ती तील शक्ती तत्त्व कुंकवात येते. नंतर ते कुंकू आपण लावल्यावर त्यातील देवीची शक्ती आपल्याला मिळते. कुंकुमार्चन करण्यासाठी विषेश दिवसाची जसे पौर्णिमा, अमावस्या, गुरु पुष्यामृत योग, लक्ष्मी पुजन, मंगळवार, शुक्रवार आदींची निवड करावी. मूळ कार्यरत शक्ती तत्त्वाची निर्मिती ही लाल रंगाच्या प्रकाशातून झाली आहे. शक्ती तत्त्वाचे दर्शक म्हणून देवीची पूजा कुंकवाने करतात. कुंकवातून गंध लहरींच्या सुवास प्रक्षेपित होतो. त्याच्याकडे ब्रह्मांडातील शक्ती तत्त्वाच्या लहरी अल्प कालावधीतच आकृष्ट होतात. त्यामुळे मूर्तीतील सगुण तत्त्वाला जागृत करण्या साठी लाल रंगाचे दर्शक तसेच देवी तत्त्वाला प्रसन्न करणाऱ्या गंध लहरींचे प्रतीक म्हणून कुंकवाच्या उपचाराला देवी पूजेत अग्रगण्य स्थान दिले आहे. मूळ शक्ती तत्त्वाच्या बिजाचा गंध हाही कुंकवातून दरवळणाऱ्या सुवासाशी साधर्म्य दर्शवणारा आहे. त्यामुळेच अनादी-अनंत काळापासून देवीला जागृत करण्यासाठी कुंकवाचे प्रभावी माध्यम वापरले जाते.

### फलश्रुती

अशा प्रकारे कुंकुमार्चन करुन अर्पण केलेले साठलेले कुंकु एका डबीत ठेवावे. अक्षय लक्ष्मी प्राप्ती तथा कार्य सिध्दी साठी याची मदत होते. परमेश्वरावर असलेली श्रद्धा व गुरूवर असलेली अपार भक्ती यामुळे माणूस आयुष्यात असाध्यही साध्य करू शकतो. देवीच्या टाकावर कुंकुमार्चन केलेल्या कुंकूवात प्रचंड शक्ती ऊर्जा व तेज सामावलेले असते. याचे कारण म्हणजे या सेवेस स्वामी आणि लक्ष्मी मातेचा आशीर्वाद आहे व असतो . हे कुंकू दररोज माता, भगिनी व विवाह इच्छुक मुलींनी कपाळी लावावे. त्यामुळे अखंड सौभाग्य व उत्तम आरोग्य लाभते. देवीची आपल्यावर विशेष कृपा राहते.

## मंगल नवरात्रोत्सव-२०२५





मंगळ ग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळ ग्रह मंदिरात दरवर्षी नवरात्र उत्सवानिमित्त शहरातील महिला मंडळाकडून मंगलेश्वरी भूमी मातेची मंगल आरती केली जाते बुधवारी सकाळी पती देवांसह मंगल आरती करताना प्रा. सौ. शीला पाटील. दुसऱ्या छायाचित्रात सदर मंगल आरतीसाठी उपस्थित असलेल्या मराठा समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. तिलोत्तमाताई रवींद्र पाटील, सौ. सुलोचनाताई वाघ, सौ. मंगलाताई वसंत पाटील, प्रा. सौ. शीलाताई पाटील, सौ. अलकाताई विनोद पाटील, सौ.लिनाताई प्रवीण पाटील, सौ. भारतीताई पाटील (कमलअक्का), सौ.मनीषाताई पाटील, सौ. रागिणीताई महाले, सौ. प्रभाताई पवार, सौ.सुदर्शनाताई पवार व सौ. भारतीताई पाटील (शिक्षिका) यांचा स्वागत सत्कार करताना मंगळग्रह सेवा संस्थेच्या मंगल सेवेकरी सौ. आशाताई महाले.







अमळनेर : मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात दरवर्षी शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त शहरातील महिला मंडळाकडून मंगळेश्वरी भूमीमातेची मंगल आरती केली जाते. बुधवारी सायंकाळी पतीदेवांसह मंगल आरती करताना बहिणाई योगा ग्रुपच्या सदस्या सौ.उर्मिलाताई जगदीश अग्रवाल, सौ. पूजाताई संजय ढमाळ व सौ. विशाखाताई प्रथमेश पाटील. (छायाचित्रे : नीतेश बारी)







मंगळ ग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळ ग्रह मंदिरात दरवर्षी नवरात्र उत्सवानिमित्त शहरातील महिला मंडळाकडून मंगलेश्वरी भूमी मातेची मंगल आरती केली जाते. गुरुवारी संध्याकाळी पती देवांसह मंगल आरती करताना गुजराथी महिला मंडळाच्या सदस्या सौ. मीनाताई प्रभाकर क्षिरसागर, सौ.सपनाताई हरिओम गुप्ता, सौ. भारतीताई दिनेश रेझा










अमळनेर : संभाजी भिडे गुरूजी प्रणीत शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संचलित जय बजरंग मंडळ पानखिडकी यांच्या तर्फे धर्म जागृतीच्या उद्देशाने आयोजित 'श्री दुर्गा माता दौड'ला गुरुवारी पहाटे पाचला पानखिडकीपासून प्रारंभ झाला. येथून दुर्गा दौडला प्रारंभ झाला. राजहोळी चौक, संतोषी माता मंदीर (त्रिकोणी बगीचा), तरूण कुढापा मित्र मंडळ, जय दुर्गा देवी माता मंदिर, सप्तश्रृंगी कॉलनी, श्री रामेश्वर भवानी माता मंदिर, पटवारी कॉलनी व विजय मारूती मंदिर येथे आरत्या झाल्या. यावेळी दौड चे ठिकठिकाणी आतषबाजी, पुष्पवृष्टी तसेच रांगोळ्यांनी स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे अनेक वर्षांपासून एक श्वानही या दुर्गा दौड मध्ये भक्तिभावाने सहभागी होतो. त्याला दुर्गा दौडमध्ये सहभागी होण्यासाठी विशेष कपडे परिधान केले जातात. (छायाचित्रे : नितेश बारी)

# नवरात्रीत कन्या पूजन कधी आणि कसे करावे ?

नवरात्रीत कन्यापूजनाचे खूप महत्व आहे. कुमारिकेला जणू साक्षात देवीचे रूप मानले जाते. नवरात्रीत प्रत्येक दिवस शुभ मानला गेला आहे. तर नवरात्रीत जमेल त्या दिवशी किंवा अष्टमी किंवा नवमीला कन्या पूजन करणे सर्वात श्रेष्ठ ठरते.

**कोणत्या वयाची कन्या पूजल्याने काय फळ मिळते ?**

कन्या पूजनासाठी दोन ते १० वर्षापर्यंत वयाच्या मुलींची पूजा करण्याची परंपरा आहे.
दोन वर्षांच्या कन्येच्या पूजनाने दारिद्र्य दूर होते.
तीन वर्षाची कन्या त्रिमूर्ती असून तिच्या पूजनाने सुख-समृद्धी नांदते. चार वर्षांच्या कल्याणीची पूजा केल्याने घराचे कल्याण होते.
रोहिणी रूपाच्या पाच वर्षांच्या कन्येला पुजल्याने आजारांपासून मुक्ती मिळते. सहा वर्षाची कन्या कालिका रूपात असून तिची पूजा केल्याने राजयोग प्राप्ती होते. सात वर्षांची कन्या चंडिका रूपात असून ऐश्वर्य प्रदान करणारी असते. शांभवी रूपातील आठ वर्षांच्या कन्येची पूजा केल्यास विजय प्राप्ती होते.
नऊ वर्षांची कन्या दुर्गा देवीचा रूप असून शत्रूंचा नाश करते. सुभद्रा रूपातील दहा वर्षांची कन्या पुजल्याने अनेक मनोकामना पूर्ण होतात.



### आता बघू की काय करावे

कुमारिका घरी आल्यावर त्यांना देवीचा रूप मानून त्यांचे मनोभावे स्वागत करावे. पाय धुऊन त्यावर कुंकू लावावे. स्वच्छ आसनावर बसवावे.कपाळावर कुंकू लावून त्यांच्या आवडीप्रमाणे गोडधोडाचे जेवण करवावे. किंवा प्रसाद म्हणून खीर पुरी, शिरा असे नैवेद्य दाखववावे. यथाशक्ती कुमारिकांना गजरा, दक्षिणा आणि भेट वस्तू द्यावी.
आपल्या इच्छाप्रमाणे किंवा यशाशक्ती कुमारिकांचे पूजन करावे. जमत नसल्यास एक कुमारिकेचे केले तरी फळ प्राप्ती होते.

# फुलोरा म्हणजे काय



नवरात्रात देवीला फुलोरा करण्याची पद्धत आहे. यात करंज्या आणि कडक पु-या, साटो-या करतात. हा फुलोरा कुटूंबातील प्रथेप्रमाणे तृतीया, पंचमी, सप्तमी, अष्टमी या दिवशी करावा. देवघरात मंडपी ठेवून हा फुलोरा बांधला जातो. पूजा करताना आपण ' यथादेहे तथा देवे ' हा भाव ठेवून पूजा करतो. आपण आपल्या घराला खरकटे कधी बांधून ठेवतो का ? खरकटे पदार्थ बांधून ठेवण्याची पद्धत चूकीची आहे. त्यापेक्षा डब्यात ठेवून त्याचा नेवेद्य दाखववावा. आपण नेवेद्य दाखवितो म्हणजे काय करतो ? समर्पण भावनेने अर्पण करतो. देव नैवेद्य स्विकारतो म्हणजे काय तर अर्पण करणा-याचा भाव पाहून सुवास घेतो.

अष्टमी किंवा नवमीला परंपरे प्रमाणे ज्या दिवशी कुलाचार असेल त्या दिवशी सकाळी शंख किंवा घंटा ध्वनी करून कुलदेवीचा टाक घटावरून उचलावा. त्यांचे प्रतिपदेला केल्याप्रमाणे श्री सुक्त अभिषेक व पंचोपचाराने पूजन करावे. त्यानंतर कुलाचार पूर्ण करून नारळ फोडावे.पुरणाच्या २१ दिव्यांनी महाआरती करावी.

नवमीच्या दिवशी सायंकाळी आरती नंतर यथाशक्ती कुमारिका व सवाष्णींना भोजनासाठी निमंत्रीत करावे. भोजनानंतर घट उत्तरेकडे हलवावा.

दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघनास जाताना घट, टोपली प्रवाहात विसर्जन करावी. मातीवर आलेले धान्य , आपट्याच्या पानासमावेत श्री स्वामी समर्थ महाराजांना , कुलदेवीला ,कुलदैवत, व घरातील ज्येष्ठांना द्यावेत.प्रसाद म्हणून स्त्रियांनी केसात माळावेत. पुरुषांनी टोपिखाली किंवा कानावर धारण करावेत. घटावरील तृणांकुराचा रस करुन घरातील सर्वांनी प्राशन करावा. हा रस आरोग्यासाठी उत्तम मानला जातो. घटाची माती आपल्या क्षेत्रात अथवा पवित्र ठिकाणी विसर्जित करावी.

# ओळख देवीच्या विविध स्तोत्राची

१) **रात्री सूक्त :** अशी मान्यता आहे की, या स्तोत्राचा पाठ रोज केल्याने आपल्यातील तमोगुण, आळस, नैराश्य दूर होते. शत्रूचा त्रास संपतो.

२) **देव्या कवच :** हे सर्वश्रेष्ठ कवच आहे. या कवचाचा पाठ केला असता अभेद्य कवच लाभते. संकटाचे निराकरण होते. श्री सप्तशतीचे पाठ करतात त्यांनी पाठापुर्वी दुर्गाकवच, अर्गला, किलक स्तोत्राचा पाठ करणे अधिक लाभदायी ठरते.

३) **भगवती किलक स्तोत्र :** या स्तोत्राच्या नित्य वाचनामुळे अपमृत्यू टळतो. हे आरोग्य, सौभाग्य, संपदा प्राप्त करून देणारे आहे. कृष्णाष्टमी, कृष्ण चतुर्दशीला सकाळ-संध्याकाळ याचे वाचन करावे.

४) **सिद्ध कुंजीका स्तोत्र :** आई भगवती चे हे अतिशय प्रभावी स्तोत्र आहे. याचे रोज ९ वेळा वाचन केल्यास एका सप्तशती पाठाचे फळ मिळते.

५) **कनक धारा स्तोत्र :** हे आद्यशंकराचार्यांनी हे स्तोत्र लिहलेले आहे.हे स्तोत्र रोज सकाळ-संध्याकाळ म्हटले असता धनलक्ष्मी प्राप्ती व सद् भाग्य प्राप्ती होते.

६) **देवी अथर्वशीर्ष :** अश्विन महिन्यातील नवरात्र उपासनेत हे स्तोत्र आवर्जून म्हणावे. याशिवाय सप्तशतीचा पाठ करणे फलदायी ठरत नाही. मंगळवार,शुक्रवार,पौर्णिमा या दिवशी हे अवश्य म्हणावे. याचे पठण केले तर पूर्वीच्या १२ तासात अजाणतेपणाने केलेल्या चूका परमेश्वर माफ करतो. रोज दहा वेळा हे म्हटले तर संकटापासून सुटका होते.हे स्तोत्र जर १०८वेळा म्हटले तर त्याचे पुरश्चरण होते.

७) **त्रिपुर सुंदरी स्तोत्र :** रोज संध्याकाळी देवापुढे तेलवात लावून शांत व प्रसन्न मनाने हे स्तोत्र म्हटले असता ऐहिक सुखाची व मनःशांती प्राप्ती होते.

८) **महालक्ष्मी कवच :** हया अष्टकाचे रोज पठण केल्यास त्यामुळे पापमुक्ती होते.तसेच जर हे अष्टक रोज दोनवेळा म्हटले तर संपत्तीलाभ होतो.त्रिकाळ पठण केले तर महाशत्रू त्रासही संपतो.